सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ४ (२) ] सोमवार, एप्रिल १९, २०१०/चैत्र २९, शके १९३२ [ पृष्ठे २, किंमत रुपये २६.००

असाधारण क्रमांक ११

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.**—महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | १-२ |

दिनांक १८ एप्रिल २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १९ एप्रिल २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२००५ चा महा. ९. २०१० चा महा. अध्या. २. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १८ फेब्रुवारी २०१० रोजी, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश, २०१० प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १८ फेब्रुवारी २०१० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ९ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९ मधील, पोट-कलम (१) चे परंतुक वगळण्यात येईल. २००५ चा महा. ९.

सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश, २०१० हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २०१० चा महा. अध्या. २.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमा-अन्वये, करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना वा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक १२(२)] सोमवार, एप्रिल १९, २०१०/चैत्र २९, शके १९३२ [पृष्ठे २, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक २६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Value Added Tax (Amendment) Act, 2010 (Mah. Act. No. VII of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. VII OF 2010.

[*First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 19th April 2010.*]

An Act further to amend the Maharashtra Value Added Tax Act, 2002.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Value Added Tax Act, 2002, for the purposes hereinafter appearing ; and therefore, promulgated the Maharashtra Value Added Tax (Amendment) Ordinance, 2010, on the 18th February 2010 ;

Mah. IX of 2005. Mah. Ord. II of 2010.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. *(1)* This Act may be called the Maharashtra Value Added Tax (Amendment) Act, 2010.

*(2)* It shall be deemed to have been come into force on the 18th February 2010.

Amendment of section 9 of Mah. IX of 2005.

2. In section 9 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002, (hereinafter referred to as " the principal Act" ), in sub-section *(1)*, the proviso shall be deleted. Mah. IX of 2005.

Repeal of Mah. Ord. II of 2010 and saving.

3. *(1)* The Maharashtra Value Added Tax (Amendment) Ordinance, 2010, is hereby repealed. Mah. Ord. II of 2010.

(2) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.